महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय, लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर.
दुरध्वनी क्र. : 0240-2392100 भारतमाता चौक, पोलीस कॉलनी रोड, डीसीटीसी इमारत,
Email ID : sp.railway-abad@mahapolice.gov.in छत्रपती संभाजीनगर - 431 003.

## पोलीस अधीक्षक,लोहमार्ग,छत्रपती संभाजीनगर पोलीस शिपाई भरती 2022-2023

## लेखी परिक्षा

### -: उमेदवारांना सुचना :-

1. लोहमार्ग,छत्रपती संभाजीनगर पोलीस शिपाई भरती 2022-2023 मधील पोलीस शिपाई पदाची लेखी परिक्षा दि.28/07/2024 रोजी खालील ठिकाणी व वेळी आयोजीत करण्यात आलेली आहे.सोबत लेखी परिक्षेकरीता पात्र उदमेवारांची यादी जोडलेली आहे.

| लेखी परिक्षा केंद्र ठिकाण | दिनांक व वेळ |
|---|---|
| जवाहरलाल नेहरु कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, एमजीएम कॅम्पस, एन-6 सिडको,छत्रपती संभाजीनगर पिन कोड- 431001 | दि.28/07/2024 रोजी सकाळी 11:00 ते 12:30 |

2. सर्व उमेदवारांनी लेखी चाचणी करीता महाआयटी कडुन अदा केलेल्या प्रवेश पत्रात नमुद दिनांकास परिक्षा केंद्रावर सकाळी 08:00 वाजेपर्यत हजर रहावे.
3. मुख्य प्रवेशव्दार 08:30 वाजता बंद केले जाईल त्यानंतर कोणत्याही उमेदवारास परिक्षाकेंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.
4. लेखी परिक्षेच्या प्रवेशपत्राशिवाय प्रवेश दिला जाणार नाही. परिक्षा केंद्रावर आलेल्या उमेदवाराने पर्यवेक्षकांसमोर हजेरी पटावर फोटो लावुन स्वाक्षरी करावी.
5. उमेदवारांनी स्वत:ची ओळख पटविण्यासाठी शासनाने जारी केलेल्या आधारकार्ड,पॅनकार्ड,मतदान कार्ड,पासपोर्ट, महाविद्यालयीन ओळखपत्र,वाहनपरवाना यापैकी कोणतेही एक मुळ आणि वैध ओळखपत्र व लेखी परिक्षेचे ऑनलाईन प्रवेशपत्र (हॉलटिकीट) तसेच दोन फोटो सोबत आणावे अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.
6. उमेदवारांना सदर लेखी परिक्षेकरीता या कार्यालयाकडुन काळे पेन व पॅड पुरविण्यात येणार आहेत.उमेदवारांनी सोबत येतांना इतर कोणतीही वस्तु,कागद आणु नये,आणल्यास सदरच्या वस्तु परिक्षा केंद्राच्या बाहेर ठेवण्यात येतील व त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.
7. उमेदवारास परिक्षा वर्गावर मोबाईल,घडयाळ,ब्लुटुथ,डिजीटल डायरी,मायक्रोफोन,नोटपॅड,नोटबुक तसेच बटण कॅमेरा,पेन कॅमेरा यासारखी इतर इलेक्ट्रानिक उपकरणे,प्रतिबंधक वस्तु स्वत:जवळ बाळगणेस पुर्णत: मनाई आहे.अशा वस्तु आढळल्यास उमेदवारास भरती प्रक्रीयेतुन बाद ठरवुन त्यांची उमेदवारी रद्द करण्याबरोबर गुन्हा दाखल करण्याची कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
8. एखादा उमेदवार लेखी परिक्षेस गैरहजर राहील्यास,त्याला पुन्हा लेखी परिक्षा घेण्याबाबत कोणतीही अतिरीक्त संधी देण्यात येणार नाही.त्याला संपुर्ण भरती प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.
9. उमेदवाराने भरती प्रक्रियेमध्ये उध्दट,गैरवर्तन/अनुचित प्रकार केल्यास किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरण्याचा,कॉपी करण्याचा अथवा डमी उमेदवार बसविण्याचा प्रयत्न केल्यास त्यास त्याच क्षणी भरती प्रक्रियेतुन बाद करुन कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
10. उमेदवार अथवा त्यांचे नातेवाईक यांनी कोणत्याही एजंट/दलाल,अधिकारी/कर्मचारी यांच्या भुलथापांना/ अमिशाला बळी पडु नये.उमेदवारांची निवड ही सर्व निकष गुणवत्तेच्या पात्रतेवर होईल.

लेखी परिक्षेकरीता पात्र उमेदवारांची यादी,लेखी परिक्षेची तारीख,वेळ व ठिकाण याबाबतची माहिती या कार्यालयाचे संकेतस्थळ csnrailway.mahapolice.gov.in ,मा.पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मंबई यांचे संकेतस्थळ www.mahapolice.gov.in व महाआयटी विभागाचे policerecruitment2024.mahait.org या तिन्ही संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर
दिनांक - 24/07/2024.

( स्वाती भोर )
पोलीस अधीक्षक,लोहमार्ग,
छत्रपती संभाजीनगर.